# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-09.05.2026 वार-शनिवार**

---

**<u>पुरस्कार</u>**

फोर्स मोटर्स लिमिटेडचे अध्यक्ष डॉक्टर अभय फिरोदिया यांना पुण्यभूषण फाऊंडेशन आणि पुणेकरांच्या वतीनं अडतिसावा पुण्यभूषण पुरस्कार प्रदान करण्याचा समारंभ आता होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येत असून. याप्रसंगी जायबंदी सैनिकांचा गौरव देखील करण्यात येत आहे.

**<u>थॅलेसेमिया</u>**

ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या बालरोग विभागात सोफोश सामाजिक संस्थेच्या माध्यमातून ८ मे रोजी जागतिक थॅलेसेमिया दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात थॅलेसेमिया बालरुग्णांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आणि त्यांना आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लप्पा जाधव, मेट्रन श्रीमती केदारी, समाजसेवा अधीक्षक विभागाचे विभागप्रमुख डॉक्टर शंकर मुगावे, संबंधित विभागातील डॉक्टर, परिचारिका, सुमारे ५० थॅलेसेमिया बालरुग्ण, सोफोश संस्थेचे पदाधिकारी तसंच रुग्णांचे पालक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.
यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लप्पा जाधव आणि मेट्रन श्रीमती केदारी यांनी मार्गदर्शन करताना थॅलेसेमिया रुग्णांसाठी समाजानं संवेदनशीलतेनं पुढे येण्याचं आवाहन केलं. तसंच थॅलेसेमिया रुग्णांना नियमित रक्तपुरवठ्याची आवश्यकता लक्षात घेता अधिकाधिक नागरिकांनी ऐच्छिक रक्तदानात सहभागी व्हावं, असंही त्यांनी सांगितलं.
डॉक्टर शंकर मुगावे यांनी थॅलेसेमिया आजार, त्यावरील उपचार तसंच ऐच्छिक रक्तदानाचं महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. जनकल्याण समितीमार्फत करण्यात आलेल्या २४ हजार नागरिकांच्या रक्त तपासणी सर्वेक्षणात सुमारे ३ टक्के नागरिकांमध्ये थॅलेसेमियाचं प्रमाण आढळून आल्याचं त्यांनी सांगितलं.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत “थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियान” राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून राज्यभरातील महाविद्यालयं, सामाजिक संस्था, सत्संग मंडळं आदी विविध स्तरांवर जनजागृती, प्रचार-प्रसार, प्रबोधन आणि रक्त तपासणी मोहिमा राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.
या अभियानामध्ये शासनासोबत जनकल्याण समिती आणि भारतीय रक्तविज्ञान शास्त्र संस्था यांचा प्रमुख सहभाग असणार असल्याचेही त्यांनी नमूद केलं. थॅलेसेमिया रुग्णांच्या पालकांनी स्वतः जनजागृतीचं माध्यम बनून समाजात जागरूकता निर्माण करावी तसंच तरुणांना ऐच्छिक रक्तदानासाठी प्रोत्साहित करावं, असं आवाहनही डॉक्टर मुगावे यांनी केलं. ऐच्छिक रक्तदान ही आजची काळाची गरज आहे असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**मॅपिंग**
मतदार यादीतील पारदर्शकता आणि अचूकता वाढवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार SIR मॅपिंग मोहीम राबवली जात आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यामध्ये अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपल्या मतदार ओळखपत्रातील माहितीची पडताळणी करून, हे मॅपिंग यशस्वीपणे पूर्ण केलं. दुबार नावं टाळण्यासाठी आणि मतदार यादीतील गोंधळ कायमचा दूर करण्याकरिता सर्व नागरिकांनी तातडीनं आपलं मॅपिंग पूर्ण करावं असं आवाहन पाटील यांनी सर्व मतदारांना केलं आहे.

**पनवेल**
पनवेल महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत आहे. त्यामुळं सिडकोनं या भागासाठी पाणी उपलब्ध करून द्यावं, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सिडको प्रशासनाला केली आहे.

खासदार श्रीरंग बारणे यांनी बेलापूर इथं सिडको कार्यालयात सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि व्यवस्थापकीय उप संचालक  गणेश देशमुख यांच्या समवेत मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक घेतली. या भागात सिडकोच्या परवानगीनं मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले गेले आहेत.  पनवेलमधील काही भाग सिडकोकडे होता. तो भाग आता महापालिकेत समाविष्ट झाला आहे. त्यामुळं पाण्याची समस्या सोडवण्याची मोठी जबाबदारी सिडकोची आहे असं बारणे यांनी सांगितलं.

**अदालत**
राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाद्वारे आज देशभरात या वर्षातील दुसऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीचं आयोजन करण्यात आलं. या लोकअदालतीमध्ये विविध प्रकारच्या वादांचे निवारण हाती घेण्यात आलं; यामध्ये तडजोडीस पात्र असलेले फौजदारी खटले, धनादेश न वटल्याची प्रकरणं आणि बँकेच्या वसुलीशी संबंधित वादांचा समावेश आहे. २०२३ ते २०२५ या कालावधीत एकंदर १२ राष्ट्रीय लोकअदालतींचं आयोजन करण्यात आलं होतं, आणि त्या माध्यमातून २६ कोटी खटल्यांचा निपटारा करण्यात आला.

**हवामान**
पुणे जिल्ह्यासाठी आज हवामानाचा नारंगी बावटा फडकवण्यात आला पुढील 3 ते 4 तासांत  पुणे  जिल्ह्यांत काही भागात वीज पडण्याची शक्यता आहे. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्या, उंच ठिकाणी, मोकळ्या जागांवर जाणं टाळा, झाडांखाली उभं राहू नका असा इशारा स्थानिक प्रशासनानं दिला आहे. पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर आकाश ढगाळ झाल्यामुळं तापमानात घट झाली आहे. उद्या कमाल 39 तर किमान 24 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**